# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/04/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### दुखापत

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत ०८ किमी अंतरावर हमलापुरी फाटा येथे २४/४/२०२३ चे ०८.०० वा. ते ०८.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– चंद्रसेन बाळकृष्ण गराडे, वय ४२ वर्ष, रा. चिचाळा ता. रामटेक जि. नागपुर याने दिनशा दुध डेलीवर दुध विकण्याकरीता गेले असता तेथे हजर असलेल्या आरोपी नामे– सुर्यभान गोपाळ लिल्हारे रा. .चिचाळा ता. रामटेक जि. नागपुर याला फिर्यादीने उधारीचे पैसे मागितले त्यावर आरोपीने तु मला कधी पैसे दिले होते तुझ्याकडे पैसे दिल्याबाबत काही लिहीले आहे का असे म्हणुन तोंडातोंडी केली व तेथे असलेल्या पोहाचे दुकानातील चाकु हातात घेवुन फिर्यादीला मारला. फिर्यादीने हात आडवा केल्याने चाकु फिर्यादीचे डावे हाताचे दुसऱ्या बोटाला लागुन रक्त निघाले. फिर्यादी रिपोर्ट देण्यास निघाले असता आरोपीने तु मला पुन्हा पैसे मागितले तर तुला पाहुन घेईन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भा.द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना ९६९ गाढवे पोस्टे रामटेक मो. नं/९८२२६१०८०२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर